# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
# (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :—
२५६०१२६६
२५६०१२७२
e-mail : dyrelg@unipune.ac.in

शैक्षणिक पात्रता विभाग
गणेशखिंड, पुणे— ४११००७

---

संदर्भ क्रमांक शै. पा./ 43 दिनांक - 24/03/2018

प्रति,
मा. प्राचार्य/ संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/ संस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
**पुणे - ४११ ००७.**

**विषय - शैक्षणिक पात्रतेसंबंधित कामकाजासाठी विद्यार्थ्यांना विद्यापीठात न पाठविण्याबाबत......**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक पात्रता क्रमांक टाकल्यानंतर परीक्षा फॉर्म उपलब्ध न होणे, शैक्षणिक पात्रतेतील विद्यार्थ्यांच्या नांवांतील दुरुस्ती किंवा पात्रता विभागाशी संबंधित इतर अनेक कामांसाठी मोठया प्रमाणात विद्यार्थी विद्यापीठाच्या शैक्षणिक पात्रता विभागात तसेच कॉलेज सपोर्टच्या कर्मचा-यांकडे येत असतात. सदर विद्यार्थ्यांकडे मा. प्राचार्यांचे पत्र, तसेच महाविद्यालयाचा लॉग-इन आणि पासवर्ड नसतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवता येत नाहीत व गैरसमजापोटी विद्यार्थ्यांच्या नाराजीला आणि रोषाला विद्यापीठ कार्यालयाला तोंड दयावे लागते.

तरी विद्यार्थ्यांच्या उपरोक्त बाबतच्या कोणत्याही तक्रारी किंवा अडचणी सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना परस्पर विद्यापीठात पाठवू नये. आपल्या महाविद्यालयातील पात्रतेचे कामकाज पाहणा-या सेवकांनाच मा. प्राचार्य/संचालकांचे पत्र तसेच शैक्षणिक पात्रतेसाठीचा महाविद्यालयास देण्यात आलेला लॉग-इन आणि पासवर्ड घेऊन पाठवावे.

कळावे,

आपला,

उपकुलसचिव
(शैक्षणिक पात्रता विभाग)